6.2.1 upload

Newspaper

देशोन्नती अपडेट

चंद्रपूर, मंगळवार, २३ जानेवारी २०२४

# निळकंठराव शिंदे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचे थाटात उद्घाटन

## चोरा येथील ग्रामस्थ व विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

देशोन्नती वृत्तसंकलन...

**भद्रावती** ▪ तालुक्यातील चोरा येथे आयोजित केलेल्या स्थानिक निळकंठराव शिंदे विज्ञान व कला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचे अत्यंत थाटात उद्घाटन पार पडले. चोरा येथील स्व. मातोश्री यमुनाबाई शिंदे विद्यालय परीसरात आयोजित केलेल्या या शिबिरात ग्रामस्थ व विद्यार्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.



शिबिरात मार्गदर्शन करताना सीडीसीचे माजी अध्यक्ष रविंद्र शिंदे

यावसंगी व्यासपिठावर अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.एल.एस. लडके, शिबिराचे उद्घाटक चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष रविंद्र शिंदे, प्रमुख अतिथी संस्था सचिव डॉ.कार्तिक शिंदे, प्रा. धनराज आस्वले, सरपंच संगीता खिरटकर, उपसरपंच विलास जिवतोडे, यांच्यासह प्राचार्य एम. यु. बरडे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. गजेंद्र बेदरे यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्वप्रथम रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. गजेंद्र बेदरे यांनी प्रास्ताविकेतून देशाच्या शैक्षणिक व सर्वांगीण विकासात जागरूक मतदाराची भूमिका या संकल्पनेवर आधारित सुशासन- जागरूक मतदार तसेच या शिबिराचा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण करणे हा एन. एस. एस. चा मुख्य उद्देश असल्याचे स्पष्ट केले. प्रा. धनराज आस्वले यांनी म्हटले की, जिवनात पुढे जायचे असेल तर वेळेला महत्त्व द्या. तरच जीवनात पुढे जाऊ शकता, तसेच वेळ आपल्याला संधी देते. त्या संधीचा सदुपयोग करावा, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे उद्घाटक रविंद्र शिंदे यांनी मार्गदर्शन करताना म्हटले की, लोकशाहीच्या माध्यमातून आपल्याला सरकारकडून जनकल्याणाची विविध कामे करून घ्यायची असतात. लोकशाहीत मतदाराला महत्वपूर्ण स्थान आहे. जास्तीत जास्त मतदार झाले पाहिजे. त्यामुळे लोकशाही बळकट होते. सुशासनामुळे राष्ट्र चालते. विद्यार्थ्यांनी मोबाईलच्या व्यसनापासून दूर राहावे. आई-वडिलांची सेवा करा. तुम्हाला सर्व प्राप्त होतील. नेहमी दुसऱ्यासाठी मदतीचा हात पुढे करीत रहा. असे विद्यार्थ्यांना आवाहन केले. डॉ. कार्तिक शिंदे यांनी देशातील वर्तमान परिस्थितीची सविस्तर माहिती दिली. आपला देश सर्वधर्मसमभावाने तयार झाला आहे त्यामुळे आपण एकत्रित राहतो. आपली लोकशाही टिकून राहते. आपल्या मतदानाचा चांगला उपयोग करा. त्यामुळे आपल्या देशाचे सुशासन व्यवस्थित सुरु राहते. आजच्या युवा पिढीवर देशाची जबाबदारी वाढली आहे. त्याकरिता त्यांनी जागृत राहण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी उपसरपंच विजय जीवतोडे यांनी एन.एस.एस. मध्ये भाग घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत सर्व प्रकारची मदत करण्याचे आश्वासन दिले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. एल. एस. लडके यांनी देशाच्या लोकशाही बद्दल सविस्तर माहिती दिली. देश चालवायचा असेल तर मतदार जागृत असणे फार आवश्यक आहे. त्यामुळे देशाचे सुशासन चांगले सुरू राहते तसेच जागरूक मतदारामुळे देशाचे कल्याण होते. चांगले राज्य चालविण्यासाठी चांगल्या प्रतिनिधींना निवडून दिले पाहिजे. तसेच विद्यार्थ्यांनी खेड्यातील जनजीवन कसे असते, ते सुध्दा जवळून पाहावे. याकरिता विद्यार्थ्यांनी अशा प्रकारच्या शिबिरामध्ये भाग घेतला पाहिजे असे आवाहन केले. सुत्रसंचालन प्रा. डॉ गजेंद्र बेदरे तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. शशिकांत सित्रे यांनी केले. यशस्वीतेसाठी प्रा. सचिन श्रीरामे, डॉ.के. पी. जुमडे, शरद भावरकर, श्रेयस रोडे, मयूर नागपुरे, सानिया शेख आणि अनामिका चौधरी यांनी सहकार्य केले. (ता. प्र.)

Sladke
Dr. L.S. Ladke
PRINCIPAL
N.S. Science & Arts College
Bhadrawati, Dist-Chandrapur

17